जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची
रजि.नं.२०१
दि.१५/१२/१९०९
सहकारी पतपेढी लि.

# जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि.जळगांव

दिनांक १८/०८/२०२४

संस्थेची ११५ वी वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दिनांक १८/०८/२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता संस्थेचे अध्यक्ष म.उदय मधुकर पाटील यांचे अध्यक्षतेखाली झाली असता खालील प्रमाणे सदस्य हजर होते. त्या सभेचे इतिवृत्त.

हजर सभासद संख्या – २७,५१० (सत्ताविस हजार पाचशे दहा मात्र)
(नांवे स्वतंत्र रजिस्टर मध्ये नोंदलेली आहे.)

"सन्माननीय सभासद बंधु भगिनीनो आज आपल्या संस्थेच्या होत असलेल्या ११५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेस आपण सर्वजण उपस्थित राहिलात त्या बद्दल मी सर्व प्रथम आपणा सर्वाचे हार्दीक स्वागत करतो."एवढे बोलुन म.अध्यक्ष सो.यांनी सभेचे कामकाजास सुरूवात केली.

सभेचे सुरूवातीस म.अध्यक्ष सो.यांनी शोक प्रस्ताव मांडला व रजिस्टर नुसार मयतांची नांवे सभेसमोर वाचुन दाखविणेत आलीत.

अहवाल वर्षात व आज अखेर भारतातील जे थोर नेते,संशोधक,तंत्रज्ञ,साहित्तीक,कलावंत,शिक्षण तज्ञ, सामाजिक व सहकार क्षेत्रतील कार्यकर्ते,संस्थेचे माजी संचालक,सभासद,कर्मचारी व सभासदांचे नातेवाईक,संस्थेचे हितचिंतक तसेच नैसर्गिक आपत्ती व विविध अतिरेकी कारवायांमध्ये शहीद झालेले नागरीक,पोलिस,सैन्य दलतील जवान तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष कै.उत्तमराव माधवराव पाटील यांचे दुःखद निधन झालेले आहे.

त्यांचे आत्म्यास सद्गती प्राप्त व्हावी व शांती लाभावी म्हणुन आपण सर्वानी एक मिनिट स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करावयाची आहे.या घटनांचे गांभिर्य ठेवुन आजची सभा शांततेत पार पाडावी अशी आपणास विनंती करतो.

येणे प्रमाणे सर्व सभासदांची एक मिनिट स्तब्ध उभे राहुन मृतात्म्यास श्रध्दांजली अर्पण केली व तद्नंतर म.अध्यक्ष सो.यांनी प्रास्ताविक भाषण केले.

यानंतर आयत्या वेळेचे विषय असल्यास दयावेत असे म.अध्यक्ष सो.यांनी जाहिर केले व त्यानुसार खालील प्रमाणे आयत्या वेळेचे विषय स्विकारणेस आलेत.

१) संस्थेची चोपडा येथील शाखा कार्यालय इमारतीबाबत विचार करणे.
२) संस्थेचे सन २०२२ अखेर मयत झालेल्या सभासदांना कर्ज माफी योजनेचा लाभ देणे बाबत विचार करणे.
३) संस्थेचे थकबाकीदार सभासदांकरीता सुरू असलेल्या संजिवनी योजनेस मुदतवाढ देणे तसेच संस्थेचे थकबाकीदार व मयत सभासदांचे शासकिय/निमशासकिय सेवेत कार्यरत असलेले वारसांना संस्थेचे सभासद करून त्यांचेकडून थकबाकी वसुल करणे बाबत विचार करणे.
४) संस्थेच्या सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालानुसार बुडीत कर्ज निधीची तरतुद खाती वर्ग करणे बाबत विचार करणे.
५) संस्थेचे जुने व निरोपयोगी फर्निचर,बॅटरी विक्रीस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत विचार करणे.

विषय क्र.१ दिनांक २७/०८/२०२३ रोजी जळगांव येथे झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणे.

ठराव :– दिनांक २७/०८/२०२३ रोजी जळगांव येथे झालेल्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त सभासदांना पुरविणेत आलेले आहे.ते मुद्रण दोष दुरूस्तीसह कायम करण्यांत यावे.

सुचक :– श्री.अनिल दयाराम चौधरी
अनुमोदक :– श्री.ज्ञानेश्वर दशरथ मराठे
ठराव : सर्वानुमते मंजुर

जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि. जळगांव
रजि.नं.२०१
दि.१५/१२/१९०९

विषय क्र.२ दिनांक ३१/३/२०२४ अखेरचा नफा – तोटा व ताळेबंद वाचुन मंजुर करणे.

ठराव :– दिनांक ३१/०३/२०२४ अखेरचा नफा – तोटा व ताळेबंद अहवालात दिल्याप्रमाणे मुद्रण दोष दुरूस्तीसह मंजुर करण्यांत यावा.

सुचक :– श्री.राजेंद्र भिमराव पाटील
अनुमोदक :– श्री.सतिष नानासाहेब सोनवणे
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.३ दिनांक ३१/३/२०२४ अखेर झालेल्या नफ्याची वाटणी कार्यकारी मंडळाने केली आहे.त्यास कार्योत्तर मंजुरी देणे.

ठराव :– दिनांक ३१/०३/२०२४ अखेर झालेला नफा रूपये १३,३३,४३,०७८.२९/– (अक्षरी तेरा कोटी तेहतीस लाख त्रेचाळीस हजार अठ्ठयाहत्तर पैसे एकोणतीस मात्र) नफा वाटणी कार्यकारी मंडळाने सुचविल्या प्रमाणे मंजुर करण्यांत यावी.सभासदांना १० % लाभांश (डिव्हीडंड) रक्कम आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी./चेकने वाटप करण्यांत यावी व थकबाकीदार सभासदांच्या खात्यावर जमा करण्यांत यावी.

सुचक :– श्री.भास्कर नारायण जाधव
अनुमोदक :– श्री.योगेश वसंत पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.४ अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

ठराव :– सन २०२३/२०२४ या सालात संस्थेच्या अहवालात दर्शविल्या प्रमाणे जादा झालेल्या खर्चास मंजुरी देण्यात यावी.

सुचक :– श्री.विश्वासराव राजाराम सुर्यवंशी
अनुमोदक :– श्री.भुषण दिलीप बोरसे
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.५ दिनांक ३१/३/२०२४ अखेरचा अहवाल वाचुन मंजुरी देणे.

ठराव :– दिनांक ३१/०३/२०२४ अखेरचा अहवाल सर्व सभासदांना पुरविण्यांत आला आहे.तो सभेसमोर वाचुन दाखविण्यात आला.सदर अहवाल मुद्रणदोष दुरूस्तीसह मंजुर करण्यांत यावा.

सुचक :– श्री.नितीन वामन साठे
अनुमोदक :– श्री.गोपाल शिवदास पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.६ सन २०२४ – २०२५ चे जमाखर्चाचे अंदाजपत्रक मंजुर करणे.

ठराव :– सन २०२४/२०२५ चे जमा खर्चाचे अंदाज पत्रक मे.कार्यकारी मंडळाने तयार केले आहे.त्याप्रमाणे ते मंजुर करण्यांत यावे.

सुचक :– श्री.राजेश उत्तमराव पाटील
अनुमोदक :– श्री.ज्ञानेश्वर जगन्नाथ पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

जळगांव जिल्हा सरकारी कर्मचारी सहकारी पतपेढी लि. जळगांव रजि.नं.२०१ दि.१५/१२/१९०२

विषय क्र.७ सन २०२३ – २०२४ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचुन दाखल करणे.

ठराव :– म.सुरेश एस.पाटील ॲन्ड कंपनी,चार्टर्ड अकौन्टंट वैधानिक लेखापरिक्षक,जळगांव यांनी संस्थेचा सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षाचा सरकारी लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला आहे.तो दाखल करण्यांत यावा व त्याची योग्य ती पुर्तता कार्यकारी मंडळाने करावी.

सुचक :– श्री.कुंदन बळीराम वायकोळे
अनुमोदक :– श्री.विक्रांत शालिग्राम चौधरी
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.८ सन २०२४ – २०२५ या वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे बाबत विचार करणे.

ठराव :– महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८१(१)(क) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ च्या नियम ६९(१) अन्वये म.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी जा.क्र./सआ/अनिलेप/नामतालिका आदेश/ ३५४/१३ दिनांक ३०/०३/२०१३ रोजीचे परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांचे लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकांची नामतालिका तयार केलेली आहे.परिपत्रकातील अटी व शर्तीस अधिन राहुन सदर नामतालिकेत नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाकडून सहकारी संस्थांचे वर्गीकरणानुसार लेखापरिक्षण करून घ्यावयाचे आहे.या बाबत सभेत चर्चा करण्यात आली.

आपली संस्था रू.१०० कोटी व त्यापेक्षा जास्त खेळते भांडवल असणाऱ्या पगारदार नोकरांची संस्था असल्यामुळे परिपत्रका नुसार आपल्या संस्थेचा समावेश “ब”या वर्गीकरणात होत आहे.त्यामुळे आपल्या संस्थेचे लेखापरिक्षण हे नामतालिकेवरील “अ” किंवा “ब”वर्गात समाविष्ट असणाऱ्या लेखा परिक्षकाकडून करून घेणे आवश्यक आहे.सन २०२४/२०२५ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करिता लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती होणे बाबतचे म.सुरेश एस.पाटील ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंट,जळगांव यांचे दिनांक ०५/०८/२०२४ रोजीचे पत्र संस्थेला प्राप्त झालेले आहे.सदरील पत्र सभेसमोर वाचुन दाखविण्यांत येवुन त्यावर सविस्तर चर्चा करणेत आली.

त्यानुसार “अ” वर्गात समाविष्ट असणारे लेखापरिक्षक म. म.सुरेश एस.पाटील ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंट,जळगांव यांची उपरोक्त परिपत्रकातील अटी व शर्ती व महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम १९६१ च्या नियम ६९(१) अन्वये प्राप्त अधिकारास अधिन राहुन वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करण्यांत येत आहे.

त्यानुसार नियुक्त लेखापरिक्षकाचे संमतीसह प्रस्ताव म.जिल्हा उपनिबंधक साो. सहकारी संस्था जळगांव यांचेकडे सादर करण्यांत यावा.

सुचक :– श्री.देवेंद्र भास्कर पाटील
अनुमोदक :– श्री.डिगंबर खंडू सोनवणे
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.९ संस्थेच्या सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षात झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत विचार करणे.

ठराव :– सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षात दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०३/२०२४ अखेर झालेला खर्च कार्यकारी मंडळाने केलेला आहे.सदरील खर्च अहवालात नमुद करणेत आलेला आहे.सर्व खर्चाचा तपशिल सभेसमोर वाचुन दाखविणेत येवुन त्यास मंजुरात देणेत आली.

सुचक :– श्री.दंगल काशिनाथ पाटील
अनुमोदक :– श्री.सचिन चंद्रकांत पाटील
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.१० अहवालात दिलेली पोटनियम दुरूस्ती मंजुर करणे.

ठराव :– संस्थेचे सभासद मागणी नुसार व कामकाजाच्या सोयीनुसार सभेत खालील प्रमाणे पोटनियम दुरूस्ती सुचविणेत आलेली आहे.

पोटनियम नं.इ – १.२ ‘सर्व साधारण सभा व तिची कामे’या शिर्षकातील नियम नं.२० मध्ये ‘वार्षिक साधारण सभेस उपस्थित राहणारे सभासदांना फराळ प्रित्यर्थ रूपये ६००/–भत्ता देण्यात यावा.तथापी थकबाकीदार/लवादी सभासदांना फराळ प्रित्यर्थ रूपये ६००/– देण्यात येवु नये’ऐवजी ‘वार्षिक साधारण सभेस उपस्थित राहणारे सभासदांना फराळ प्रित्यर्थ भत्ता देण्यात यावा.भत्ता देण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास राहतील.तथापी थकबाकीदार/लवादी सभासदांना फराळ प्रित्यर्थ भत्ता देण्यात येवु नये.’अशी दुरूस्ती घेणेत यावी.

पोटनियम फ – १.१० ‘कर्ज विषयक धोरण’ या शिर्षकात नियम नं.५ (नविन) सोलर उर्जा कर्ज – पर्यावरण संरक्षण व उर्जा बचतीसाठी घरावर सोलर सिस्टीम बसविणेसाठी सभासदास रक्कम रूपये २,००,०००/– पर्यत कर्ज मंजुर करणेत येईल.सदरील कर्जास जामिनकी कर्जाचा व्याज दर लागु राहिल.सदर कर्जास नियमाप्रमाणे साखळीतील दोन जामिनदार आवश्यक राहतील.अशी दुरूस्ती घेणेत यावी.

सभासद योजनेतील योजना क्रमांक ७ सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेमध्ये नियम नं.७ (नविन) ७.दरवर्षी दिनांक ३० जुन,३० सप्टेंबर,३१ डिसेंबर व दिनांक ३१ मार्च रोजी वर्गणीवर मिळणारे व्याजातुन रक्कम रूपये १०/– वसुल करणेत येवुन सदरची रक्कम या योजनेत वर्ग करणेत यावी.नियम नं.८ (नविन) सदर निधीची रक्कम ही एकत्रित‘सभासद कल्याण योजना निधी’खाती जमा करून एकत्रित खर्च करणेत येईल.अशी दुरूस्ती घेणेत यावी.

सभासद योजनेतील योजना क्रमांक ८ ‘राजमाता जिजाऊ कन्यादान योजना’ऐवजी ‘राजमाता जिजाऊ शुभमंगल योजना ’असे नाव बदल करणेत यावे.तसेच ‘जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि.जळगांवच्या कोणत्याही सभासदांचे मुलीचे विवाह प्रसंगी संस्थेने हातभार लावणेचे दृष्टीने तसेच समाजात मुलीचे प्रमाण वाढावे असा या योजनेचा उद्देश असुन त्यासाठी सभासदांकरिता सदरील योजना राबविण्यांत येत आहे. ’ऐवजी‘जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि.जळगांवच्या कोणत्याही सभासदांचे मुलाचे/ मुलीचे विवाह प्रसंगी त्यांच्या आनंदात संस्थेचा सहभाग असावा व संस्थेकडून सप्रेमभेट देणे हा योजनेचा उद्देश असुन त्यासाठी सभासदांकरिता सदरील योजना राबविण्यांत येत आहे.’अशी दुरूस्ती घेणेत यावी.तसेच नियम नं.२ मध्ये‘सदर योजनेचा लाभ फक्त संस्थेच्या सभासदांनाच होईल.मुलीचे आई वडील दोन्ही सभासद असल्यास फक्त एकाचाच अर्ज स्विकारला जाईल.’ऐवजी ‘सदर योजनेचा लाभ फक्त संस्थेच्या सभासदांनाच होईल.मुलाचे/मुलीचे आई वडील दोन्ही सभासद असल्यास फक्त एका सभासदास लाभ दिला जाईल’अशी दुरूस्ती घेणेत यावी.नियम नं.३ मध्ये‘सदरील योजनेचा लाभ हा सभासदाच्या प्रत्येक मुलीस दिला जाईल.’ऐवजी‘सदरील योजनेचा लाभ हा फक्त सभासदाच्या दोन पाल्यास दिला जाईल.’अशी दुरूस्ती घेणेत यावी. तसेच नियम नं.६ मध्ये ‘दरवर्षी दिनांक ३० जुन,३० सप्टेंबर,३१ डिसेंबर व दिनांक ३१ मार्च रोजी वर्गणीवर मिळणारे व्याजातुन रक्कम रूपये २५/– वसुल करणेत येवुन सदरची रक्कम या योजनेत वर्ग करणेत यावी.’ऐवजी ‘दरवर्षी दिनांक ३० जुन,३० सप्टेंबर,३१ डिसेंबर व दिनांक ३१ मार्च रोजी वर्गणीवर मिळणारे व्याजातुन रक्कम रूपये ४०/– वसुल करणेत येवुन सदरची रक्कम या योजनेत वर्ग करणेत यावी.’अशी दुरूस्ती घेणेत यावी.

उपरोक्त नमुद सभासदांचे सुचनेनुसार व कामकाजाच्या सोयीनुसार सुचविणेत आलेली पोटनियम दुरूस्ती जशीच्या तशी स्विकारणेत येत आहे.

जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि. जळगांव
रजि.नं.२०१
दि.१५/१२/१९०९

सुचकः श्री.सचिन वासुदेव साळुंखे
अनुमोदक : श्री.रमेश धोंडू सपकाळे
ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र.११ संस्थेचे सुधारित कर्मचारी आकृतीबंध व वेतन श्रेणीना मान्यता देणे बाबत विचार करणे.

ठराव :— संस्थेचा यापुर्वीचा कर्मचारी आकृतीबंध सन २०१६ मध्ये मंजुर करणेत आलेला आहे.तथापी सदयस्थितीत संस्थेची सभासद संख्या व कर्मचाऱ्यांचे कामकाज विचारात घेता कामकाजाचे सोयीसाठी संस्थेने वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक ०४/०९/२०२२ मधील ठराव क्र.२० अन्वये एकुण ३३६ पदांचा सुधारित कर्मचारी आकृतीबंध मंजुरी बाबतचा प्रस्ताव म.जिल्हा उपनिबंधक सो.सहकारी संस्था,जळगांव यांच्या कार्यालयाकडेस सादर करणेत आलेला होता.

म.जिल्हा उपनिबंधक सो.सहकारी संस्था,जळगांव यांच्या कार्यालयाकडून सदरील सुधारित कर्मचारी आकृतीबंधास पत्र जा.क्र./२२०४/युआरबी –२/ज.जि.सर.नो. स.पत./जळ/सुधा.कर्म .आकृतीबंध/मान्यता/२०२३ दिनांक १३/०६/२०२३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.सदरील पत्र व त्यातील अटी शर्ती सभेसमोर वाचुन दाखविणेत येवुन नविन सुधारीत कर्मचारी आकृतीबंधास मंजुरात देणेत आली.

सुधारित कर्मचारी आकृतीबंधानुसार कर्मचाऱ्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| कर्मचारी तपशिल | व्यवस्थापक | विभागिय अधिकारी | शाखाधिकारी | उप शाखाधिकारी | रोखपाल | लिपीक (वर्ग–३) | शिपाई (वर्ग–४) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुधारीत कर्मचारी आकृतीबंधानुसार पदसंख्या | ०१ | १४ | ५८ | ५८ | ५५ | ७५ | ७५ | ३३६ |
| दि.०१/०७/२०२४ रोजीची प्रत्यक्षात कार्यरत कर्मचारी संख्या | ––– | ०८ | ५३ | ५९ | ६० | ३५ | ५३ | २६८ |
| दि.०१/०७/२०२४ ते दि.३१/१२/२०२४अखेर सेवानिवृत्त होणारे कर्मचारी | ––– | ०१ | ०१ | ०२ | ––– | ०१ | ०१ | ०६ |
| कमी(आवश्यक)कर्मचारी संख्या | ––– | ०७ | ०४ | ०१ | ०५ जादा | ३९ | २१ | ––– |

संस्थेच्या आर्थिक व्यवहारात व सभासद संख्येत वाढ झालेली आहे.त्या अनुषंगाने दैनंदिन कामकाजात देखील वाढ झालेली आहे.त्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत आहे. सुधारित आकृतीबंधानुसार सेवानिवृत्ती ,राजिनामा इत्यादी कारणांनी रिक्त होणारी लिपीक व शिपाई पदे एकत्रित रित्या सरळसेवा भरतीव्दारे भरती करणेची कार्यवाही करावी असे चर्चेअंती सर्वानुमते ठरविणेत आले.याबाबत चे आवश्यक ते सर्व अधिकार मे.कार्यकारी मंडळास प्रदान करणेत आलेत.

सुचक :— श्री.दिलीप श्रावण पाटील
अनुमोदक :— श्री.अजित महारू तडवी
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.१२ या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

ठराव :— आज दिनांक १८/०८/२०२४ रोजीचे वार्षिक साधारण सभेस एकुण २७,५१० क्रियाशिल सभासद हजर आहेत.संस्थेची एकुण सभासद संख्या ३३,४५७ एवढी असुन ५,९४७. सभासद सभेस अनुपस्थित आहेत.या बाबत सभेत सखोल व सविस्तर चर्चा करणेत आली.त्यानुसार संस्थेचे ५,९४७ एवढे सभासद अनुपस्थित असुन त्यांची अनुपस्थिती क्षमापित करणेत यावी.असे सर्वानुमते ठरविणेत येवुन त्यास मंजुरी देण्यात आली.तसेच सभेस उपस्थित सभासदांना रू.९००/— मात्र भत्ता अदा करणेस मंजुरात देणेत आली.

सुचक :— श्री.गुलाबराव कृष्णराव पाटील
अनुमोदक :— श्री.शिवाजी वाल्हा जाने
ठराव : सर्वानुमते मंजुर

रजि.नं.२०९ दि.१५/१२/१९०१

**आयत्या वेळेचे विषय**

विषय क्र.१३ संस्थेची चोपडा येथील शाखा कार्यालय इमारतीबाबत विचार करणे.

ठराव :— संस्थेची चोपडा येथे सि.स.नं.६०१९ प्लॉट नं.४५ ही स्वमालकीची दुमजली इमारत आहे.सदरील इमारतीत संस्थेचे पाच शाखा कार्यालये कार्यरत आहेत.सदरील इमारत ही जुनी व जिर्ण झालेली असुन पावसाळयात इमारतीचा स्लॅबला गळती लागते त्यामुळे कार्यालयातील फर्निचर व कार्यालयीन रेकॉर्ड खराब होत आहे तसेच कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदर इमारत अपुर्ण पडत आहे.ही इमारत जुनी,विटामातीची लोडबेअरीग बांधकाम असलेली आहे.त्यामुळे सदर इमारतीवर वाढीव बांधकाम करता येणार नाही.सदरील इमारत ही जुनी व जिर्ण झाल्याने ती कोसळल्यास जिवित व वित्तीय हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदरील इमारत जुनी व जिर्ण झाल्याने ती पाडून जमिनदोस्त करणेत यावी व त्या जागेवर नविन,प्रशस्त बांधकाम करणेत यावे.याबाबतचे निर्णय घेणेचे सर्व अधिकार मे. कार्यकारी मंडळास देणेत आलेत.

सुचक :— श्री.गुणवंत बाबुराव वाघ
अनुमोदक :— श्री.विनायक प्रल्हाद चौधरी
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.१४ संस्थेचे सन २०२२ अखेर मयत झालेल्या सभासदांना कर्ज माफी योजनेचा लाभ देणे बाबत विचार करणे.

ठराव :— संस्थेचे मंजुर पोटनियमातील सभासद योजना शिर्षकातील योजना क्र.१ व ३ अन्वये “मयत सभासदांना जामिन व विशेष कर्ज मुक्ती फंड”योजनेतंर्गत मयत झालेल्या कर्जदार सभासदास दिनांक ०१/१२/२०२२ पासुन संपुर्ण १०० % कर्ज माफीचा लाभ देण्यात येत आहे.

तथापी सन २०२२ पुर्वी विविध अपरिहार्य कारणांनी मयत लवादी सभासदांकडील वसुल न झालेल्या थकीत कर्जाची संस्थेस तरतुद करावी लागत असल्याने पतसंस्थेच्या अनुत्पादक मत्तेत (एन.पी.ए.) वाढ होत आहे.त्यामुळे पतसंस्थेस मोठया प्रमाणात तरतुदी कराव्या लागत असुन पतसंस्थेचा स्वनिधी खर्ची पडत आहे.

संस्थेचे सन २०२२ (दिनांक ३०/११/२०२२) अखेर मयत झालेले २७ लवादी सभासदांना त्यांचे कडील येणे सर्व प्रकारचे कर्ज व्याजासह माफ करणे बाबत सभेत सविस्तर चर्चा करणेत आली.मयत झालेल्या लवादी सभासदांकडील थकीत कर्ज वसुलीसाठी संस्थेतर्फे खुप प्रयत्न करून देखील सदरचे कर्ज वसुल होऊ शकले नाही.त्यापैकी काही सभासद हे बेपत्ता व परागंदा असुन काही मयत सभासदांना वारस देखील नाहीत तर काही मयत सभासद यांची नादारी व कौटुंबीक दुरावस्थेमुळे त्यांचे कडील थकीत कर्ज वसुल होणार नाही.याबाबत वार्षिक सर्व साधारण सभेची खात्री झालेली असल्याने दिनांक ३०/११/२०२२ अखेर मयत झालेल्या २७ सभासदांचा सहानुभुतीपुर्वक विचार करता त्यांना पुर्वलक्षी प्रभावाने संपुर्ण कर्ज माफी योजनेचा लाभ देणेत यावा असे सखोल व सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते ठरविणेत आले.

सदर मयत लवादी २७ सभासदांच्या कर्ज माफी मुळे संस्थेच्या उत्पन्नावर होणारा विपरित परिणाम होऊ नये याकरीता दिनांक ३०/११/२०२२ अखेर मयत झालेल्या सभासदास माफ केलेले कर्ज व्याजासह रक्कम ही संस्थेच्या सभासद कल्याण निधीतुन खर्ची/नावे (Debit) टाकणेस मान्यता देणेत येत असुन या ठरावानुसार कार्यकारी मंडळाने पुढील आवश्यक ती कारवाई पुर्ण करावी.

सुचक :— श्री.अमोल बबनराव परवाले
अनुमोदक :— श्री.रविंद्र किशोर सोनवणे
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.१५ संस्थेचे थकबाकीदार सभासदांकरीता सुरू असलेल्या संजिवनी योजनेस मुदत वाढ देणे तसेच संस्थेचे थकबाकीदार व मयत सभासदांचे शासकिय/निमशासकिय सेवेत कार्यरत असलेले वारसांना संस्थेचे सभासद करून त्यांचेकडून थकबाकी वसुली करणे बाबत विचार करणे.

जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि. जळगांव
रजि.नं.२०१
दि.१५/१२/१९०९

ठराव :— संस्थेचे थकबाकीदार सभासदांचे वर्गणी खर्ची पडलेले खाते पुनर्जिवीत करणे करीता 'संजिवनी योजना' राबविणेत आलेली आहे.सदरील योजनेस मुदत वाढ देणे बाबत सभेत सविस्तर चर्चा करणेत आली.

सभासदांचे विविध अपरिहार्य कारणांमुळे वसुल न झालेल्या थकीत कर्जाची तरतुद संस्थेस करावी लागत असल्याने पतसंस्थेच्या अनुत्पादक मत्तेत (N.P.A.) वाढ होत आहे.संस्थेची थकबाकी वसुल होणेचे दृष्टीने सदरील संजिवनी योजनेस अटी व शर्तीसह मुदत वाढ देणेत यावी.असे चर्चेअंती सर्वानुमते ठरविणेत आले.

तसेच संस्थेचे थकबाकीदार व मयत सभासदांचे शासकिय/निमशासकिय सेवेत कार्यरत असलेले वारसांना संस्थेचे सभासद करून त्यांचेकडून थकबाकी वसुल करणे बाबत सभेत सविस्तर चर्चा करणेत आली.

संस्थेचे थकीत कर्ज वसुल होणे ही बाब संस्थेचे आर्थिक हित विचारात घेता संस्थेचे थकबाकीदार व मयत सभासदांचे शासकिय/निमशासकिय सेवेत कार्यरत असलेले वारसांना संस्थेचे सभासद करून त्यांचेकडून थकबाकी वसुल करणेत यावी,असे सर्वानुमते ठरविणेत आले.

तथापी सदरील योजनेचा लाभ घेणाऱ्या सभासदास १ वर्ष पावेतो नियमित कर्ज परत फेड केल्यानंतरच सभासदाची कर्ज फेडीची क्षमता विचारात घेवुन सभासदास कर्ज नुतनीकरण करता येईल.सदरील योजनांची मुदत ही दिनांक ३१/०८/२०२५ पावेतो राहिल.या बाबतचे आवश्यक ते सर्व अधिकार मे.कार्यकारी मंडळास प्रदान करणेत आलेत.

सुचक :— श्री.दिनेश नामदेव गोयर
अनुमोदक :— श्री.सतिष मोहन करोसिया
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.१६ संस्थेचा सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालानुसार बुडीत कर्ज निधीची तरतुद ही नियमित कर्जावरील तरतुद खाती वर्ग करणे बाबत विचार करणे.

ठराव :— संस्थेचे सन २०२३/२०२४ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालातील "तरतुदी"या शिर्षकात सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य ,पुणे यांचे कार्यालयाकडील दिनांक ०५/०२/२०२४ रोजीचे परिपत्रकानुसार उत्तम जिंदगीवर तरतुद करणे बाबत नमुद केलेले आहे.

संस्थेने सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षात एकुण तरतुद रक्कम रूपये २,४०,४९,०१८/— मधुन मार्च २०२४ मध्ये रक्कम १,४९,७६,८१९/—मात्र तरतु केलेली आहे.रक्कम रूपये ९०,७२,१९९/— मात्रची तरतुद करावयाची बाकी आहे.एन.पी.ए.कर्जावरील एकुण तरतुदीत बुडीत कर्जावरील मार्च २०२४ अखेर करण्यात आली आहे.त्यामुळे वेगळी तरतुद करणेची आवश्यकता नाही.असे म.वैधानिक लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षण अहवालात नमुद केल्याने शिल्लक नियमित कर्जावरील तरतुद बुडीत कर्ज निधीची तरतुदीतुन वर्ग करणे बाबत सभेत सविस्तर चर्चा करणेत आली.

त्यानुसार बुडीत कर्ज निधीची रक्कम ९०,७२,१९९/— मात्र नियमित कर्जावरील तरतुद खाती वर्ग करून बुडीत कर्ज निधीची स्वतंत्र गुंतवणुक केलेली रक्कम राखीव निधीस वर्ग करणेत यावी असे चर्चेअंती सर्वानुमते ठरविणेत येवुन त्यास मान्यता देणेत आली.

सुचक :— श्री.सुरेश भगवान भालेराव
अनुमोदक :— श्री.दिपक बन्सी भालेराव
ठराव : सर्वानुमते मंजुर

विषय क्र.१७ संस्थेचे जुने व निरोपयोगी फर्निचर,बॅटरी विक्रीस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत विचार करणे.

ठराव :— संस्थेच्या जिल्हयाभरातील शाखा कार्यालये व मुख्यकार्यालय,जळगांव येथील जुन्या व खराब बॅट्या एकुण नग ०३ रूपये २,५००/— या किंमतीत प्रति नग प्रमाणे डेडस्टॉक मधुन विक्री करणेत आलेल्या आहेत.ताळेबंदानुसार जुन्या व निकामी बॅटरीची किंमत रक्कम रूपये ६४,१०२/— मात्र आहे.डेडस्टॉक रजिस्टर मधील मुळ किंमत रूपये ६४,१०२/— मात्र घसारा फंडात नावे टाकुन बॅटरी डेडस्टॉक खाती जमा करून रॉईट ऑफ (निर्लेखित) करणेत आलेली आहे त्यास कार्योत्तर मंजुरात देणेत आली.

तसेच यापुढे दि.३१/०३/२०२५ पर्यत होणाऱ्या फर्निचर, बॅटरी व संगणक वस्तु विक्रीस व रक्कम रॉईट ऑफ (निर्लेखित) व्यवहार घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सुचक :– श्री.जितेंद्र खेमचंद्र किरंगे
अनुमोदक :– श्री.जगदिश परशुराम सैंदाणे
ठराव : सर्वानुमते मंजुर

येणे प्रमाणे सभेचे कामकाज होवुन म.अध्यक्ष साो.यांनी उपस्थितांचे तसेच सभेस नुतन मराठा महाविद्यालयाचे सभागृह वापरावयास दिल्याने संस्था चालकांचे आभार मानले.राष्ट्रगीत होवुन सभा संपल्याचे जाहिर केले.

स्वाक्षरी – XXX
(उदय मधुकर पाटील)
अध्यक्ष
ज.जि.सर.नो.सह.पत.लि.जळगांव

जळगांवः
दिनांक : १८/०८/२०२४